सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**

"वनभवन", रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१

दूरध्वनी क्र. (0712) 2556788 ई-मेल *pccfpmngp@mahaforest.gov.in*

क्रमांक : प्रमुवसं(उवव्य)/वस्विस/स्थाआ/२०२५-२६/ ६५ दिनांक २२.०८.२०२५

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व/पश्चिम
मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (सर्व)
उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी (सर्व)

विषय:- वरिष्ठांकडे सादर होणारे संदर्भ संबंधित कार्यालय प्रमुखांच्या मान्यतेनेच निर्गमित होण्याबाबत.

क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या संदर्भांचे अवलोकन केले असता, बऱ्याच वेळा असे निदर्शनास येते की, ते संबंधीत कार्यलय प्रमुख (मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक) यांचे स्वाक्षरी ऐवजी त्यांचे अधिनस्त असलेले अधिकारी उदा. विभागीय वन अधिकारी (नियोजन/दक्षता) किवा प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्राप्त होत असतात. वस्तुत: अधिनस्त अधिकारी यांचे स्वाक्षरीने वरिष्ठांना अहवाल सादर करताना संबंधीत कार्यालय प्रमुखांने मसुदा मान्य केले आहे किंवा कसे, याचा स्पष्ट उल्लेख अहवालात असणे आवश्यक आहे.

२.०० संबंधीत कार्यालय प्रमुखाने स्वत: न पाहता तसेच संदर्भावर औपचारिकरित्या मान्यता प्रदान न करता अधिनस्त अधिकाऱ्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे संदर्भ सादर करणे आक्षेपार्ह आहे, या बाबीकडे सर्वांचे लक्ष वेधण्यात येत आहे. वरिष्ठांकडे सादर होणारे संदर्भ हे जरी अधिनस्त अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाले असले तरी अशा संदर्भासंबंधी संबंधित कार्यालय प्रमुख हे पुर्णपणे जबाबदार ठरतात. सबब, या द्वारे निर्देशित करण्यात येते की, अधिनस्त अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर केलेल्या संदर्भावर **"मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक यांचे कडून मान्य मसुदा"** या स्वरुपाचा स्पष्ट उल्लेख असल्याशिवाय या कार्यालयास सादर केला जाणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

(संजीव गौड)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(उत्पादन व व्यवस्थापन)

प्रतिलिपी:-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)/अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) यांना माहितीस्तव